

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

गणपति बाप्पा मोरया

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २ सप्टेंबर २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३३४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८




२५ लाख



२० लाख



१५ लाख

# डी गँगकडून भारतात स्पेशल युनिटचे स्टार्टअप

सुराज्य/सोलापूर

**मोस्ट वाँटेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या डी गँगने भारतात पुन्हा एकदा स्लिपर सेलच्या माध्यमातून क्रिमिनल ॲक्टिव्हिटीजचे स्टार्टअप सुरू केल्यानंतर भारतीय राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयए तात्काळ ॲलर्ट झाली आहे. दाऊदच्या भावाला बेड्या ठोकून डी गँगच्या दणका दिल्यानंतर आता एनआयएने थेट दाऊदवर २५ लाख, छोटा शकील २० लाख आणि टायगर मेमन याच्यावर १५ लाखांचे बक्षीस जाहीर करून डी गँगला चॅलेंज दिले आहे.**




अलीकडच्या काळात डी गँगने शस्त्रास्त्रे, स्फोटके, ड्रग्ज आणि बनावट चलनी नोटा भारतात आणण्याचा उद्योग सुरू केला असून पाकिस्तानी एजन्सी आणि देशातील दहशतवादी संघटनेच्या माध्यमातून टेरर ॲक्टिव्हिटीजचा स्टार्टअप सुरू केला आहे. त्याची भणक लागताच एनआयए ॲलर्ट झाली असून इब्राहिमचा भाऊ अनीस इब्राहिम ऊर्फ हाजी अनीस, त्याचा जोडीदार जावेद पटेल ऊर्फ जावेद चिकना, शकील शेख ऊर्फ छोटा शकील आणि इब्राहिम मुस्ताक अब्दुल रज्जाक मेनन ऊर्फ टायगर मेनन यांच्या पंटरवर वॉच ठेवला असल्याची माहिती एनआयएच्या अधिकाऱ्याने दिली.

## मोस्ट वाँटेडचा शोध सुरू

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडून यापूर्वीच दाऊदवर २००३ मध्ये २५ लाख डॉलर्सचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. दाऊदशिवाय भारताच्या मोस्ट वॉन्टेड यादीत लष्कर-ए-तोयबाचा प्रमुख हाफिज सईद, जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मौलाना मसूद अझहर, हिजबूल मुजाहिद्दीनचा संस्थापक सईद सलाहुद्दीन आणि त्याचा खास अब्दुल रौफ असगर यांचा समावेश करण्यात आला असून त्यांचाही शोध सुरू करण्यात आला आहे.

## बडे राजकारणी आणि व्यावसायिक टार्गेट

एनआयए दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी फेब्रुवारीमध्ये तपास यंत्रणांकडून दाऊदविरुध्द पुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. इंटेलिजेंस इन्व्हेस्टिगेशन एजन्सीकडून मिळालेल्या माहितीनुसार, डी गँगकडून भारतात स्पेशल युनिट सुरू करण्यात आले असून त्यामार्फत दहशतवादी संघटना आणि पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या सहकार्याने देशातील बडे राजकारणी आणि व्यावसायिकांना टार्गेट बनवण्याचा प्लॅन आहे.

## स्लिपर सेलला केले ॲक्टिव्ह

लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, इंडियन मुजाहिद्दीन, आणि अल-कायदा यासारख्या दहशतवादी संघटनांचे स्लिपर सेल यापूर्वीच देशात सुरू झाले होते. मात्र मध्यंतरीच्या काळात हे स्लिपर सेल काही प्रमाणात स्लिप झाले होते. मात्र स्लिपर सेलला मदत करणे आणि भारतात दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचा उद्योग डी गँगने सुरू केल्यामुळे हे स्लिपर सेल पुन्हा एकदा ॲक्टिव्ह झाले आहेत.

## डी गँगच्या विरोधात २९ ठिकाणी छापे

यावर्षी मे महिन्यात एनआयएने डी गँगच्या तब्बल २९ अड्ड्यांवर धाडी टाकल्या. त्यामध्ये सुहेल खंडवानी, १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी समीर हिंगोरा, सलीम कुरेशी ऊर्फ सलीम फ्रूट, छोटा शकीलचा नातेवाईक गुड्डू पठाण, दाऊदच्या भावाचा भिवंडी येथील नातेवाईक इक्बाल कासकर आणि कय्युम शेख यांचा यामध्ये समावेश होता. याशिवाय यांच्याशी संबंधित अन्य काही लोकांच्या अड्ड्यांवरही एनआयएने छापेमारी केल्याचे सांगण्यात आले.

# बादोले येथे विहिरीत पडून १८ वर्षीय युवकाचा मृत्यू

**अक्कलकोट :** बादोला (ता.अक्कलकोट) येथे बैल चारत असताना पाय घसरून विहिरीत पडून एका १८ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. ही घटना दि.३० ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजता घडली आहे. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात खबर दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे परिसरात एकच हळहळ व्यक्त केला जात आहे.मयत सुरेश सिद्धप्पा चिलगुंडे (रा. बादोले) हा दि.३० ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे खंडाने केलेल्या दत्तात्रय पाचंगे यांच्या शेतात बैल चारण्यासाठी सोडला होता. त्याला पोहता येत नव्हते. दुपारी साडेतीन वाजता सदर विहिरीजवळ बैल चरत होते. दरम्यान बैल विहिरीत पडेल या भीतीने बैलाला ओढण्यासाठी गेले असता स्वतःच तोल जाऊन विहिरीत पडून मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांनी लावला आहे. या विहिरीत मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने त्याचे प्रेत दिसून येत नव्हते. मोटारी लावून रात्रभर पाणी काढून प्रेत बाहेर काढले. त्याच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ असा परिवार आहे. तो शिक्षण शिकत होता.



मयत सुरेश चिलगुंडे हा बी ए च्या पहिल्या वर्षात अक्कलकोट येथील कॉलेजमध्ये शिक्षण घेत होता. बैलाला विहिरीपासून लांब सरकवण्या साठी गेले असता, पायाला काहीतरी तटून थेट विहिरीत पडला. त्याला पोहोयला येत नसल्याने पाण्यात बुडुन त्याचा मृत्यू झाला आहे.

संध्याकाळी बैल दीड किलोमीटरवर अंतरावरून थेट घरी पोहचले, तेव्हा नातेवाईकांनी हा काय आला नाही म्हणून घटनास्थळी गेले असता, विहिरीतील पाण्यात चप्पल व टोपी तरंगत होते. त्यावरून विहिरीत पडल्याचे संशय घेऊन ग्रामस्थांनी पोलिसांना कळवले. तेव्हा ग्रामस्थांच्या मदतीने पाच मोटारी बसवून पाणी बाहेर काढण्याचा सुरवात झाले. तब्बल बारा तासांनी पंचवीस फूट पाणी बाहेर येताच प्रेत दिसला. तेव्हा बाहेर काढण्यात आले.

मंगळवेढा येथे निवडणुकीच्या कारणावरून

# घरात घुसून लहान मुलीचा खुनाचा प्रयत्न; ८ जणांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

ग्रामपंचायत निवडणुकीच्या वादातून महिलेच्या घरात घुसून एका लहान मुलीचा गळा दाबून खून करण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवेढा येथील शनिवार पेठेत मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी ८ जणाविरुध्द घरात घुसून खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला.

यासंदर्भात सुनिता सिध्देश्वर गोसडे (वय ५५ रा.शनिवार पेठ, शरद कॉलनी) यांनी मंगळवेढा पोलिसात फिर्याद दाखल केली. मंगळवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास गावातील लक्ष्मण सावंजी, बालाजी लेंडवे, राजेंद्र लेंडवे, शिवाजी सरगर, मिथुन अवताडे, प्रशांत अवताडे, आबा सावंजी आणि विक्रम गाढवे असे ८ जण दारू पिऊन आपल्या घरात घुसले होते. आणि तुम्ही साधना लेंडवे यांच्या विरोधात तुमची सून सोनाली गोसडे हिला उभी का केली? म्हणून शिवीगाळ करून धमकी दिली. त्यावेळी बालाजी लेंडवे याने त्यांची नात श्रेया गोसडे (वय ३ वर्षे) हिला उचलून घेतले. आणि हिच्या वडिलाने आमच्याविरुद्ध खूप प्रचार केला. हिला जिवंत सोडत नाही. असे म्हणत तिचा गळा आवळून गादीवर आपटले. त्यावेळी भांडण सोडण्यासाठी आलेले विशाल जाधव यांना सर्वजण धक्काबुक्की केली. असे सुनिता गोसडे यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक वाघमोडे करीत आहेत.




# दोरीने फरपटत नेऊन खुनाचा प्रयत्न

## आरोपीला जन्मठेप

सुराज्य/सोलापूर

**अनैतिक संबंधाची वाच्यता केल्याच्या कारणावरून गोकूळ खांडेकर यांच्या झोपेत असताना गळ्याला दोरी बांधून फरपटत नेऊन पाण्याच्या हौदात बुडवून खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून संतोष सखाराम महानुरे (वय ३४ रा.सिंदखेड ता.अक्कलकोट) याला जन्मठेप आणि ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा अतिरिक्त सत्रन्यायाधीश एम.ए भोसले यांनी गुरुवारी ठोठावली.**

या खटल्याची थोडक्यात हकिकत अशी, गोकूळ खांडेकर याची पत्नी व आरोपी संतोष महानुरे यांच्यात अनैतिक संबंध होते. हा प्रकार गोकूळ खांडेकर यास समजल्यानंतर त्यांनी ही बाब त्याचे सासरे दत्तात्रय महानुरे यांना सांगितली होती. त्यामुळे संतोष महानुरे हा खांडेकर याचेवर चिडून होता.

घटनेच्या रात्री म्हणजे १९ मे २०२० रोजी गोकूळ खांडेकर हे शेळया बांधण्याच्या गोठयाजवळील कट्टयावर त्यांच्या लहान मुलासह झोपले होते.पहाटे ३ वाजेच्या सुमारास आरोपी संतोष महानुरे याने झोपेत असलेल्या खांडेकर त्याच्या गळयाभोवती दोरी बांधली त्यानंतर फरफटत नेऊन जवळ असलेल्या हौदापर्यंत नेले. आणि त्यांना हौदातील पाण्यात बुडविले होते. गळयाभोवती दोरी आवळल्याने त्यांना आरडाओरड करता आली नव्हती. मात्र त्यांच्या जवळ झोपलेला मुलगा समर्थ हा ओरडल्याने गावातील लोक गोळा झाले. त्यांनी गोकूळ यास संतोष महानुरेच्या तावडीतून सोडवून पाण्याच्या हौदातून बाहेर काढले. आणि आरोपी संतोष महानुरे यास गावक-यांनी जागीचा पकडून पोलीसांच्या ताब्यात दिले होते.



या संदर्भात गोकूळ खांडेकर यांनी अक्कलकोट उत्तर पोलिसात फिर्याद दिली होती.पोलिसांनी आरोपी विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. तत्कालीन सहायक निरीक्षक देवेंद्र राठोड यांनी गुन्हयाचा तपास करून न्यायालयात दोषारोप सादर केले होते. या खटल्यात सरकार पक्षातर्फे ८ साक्षीदार तपासण्यात आले. मूळ फिर्यादी खांडेकर आणि त्यांचा अज्ञान मुलगा समर्थ खांडेकर, डॉ. निखिल क्षीरसागर यांची साक्ष महत्त्वाची ठरली. तसेच सरकारी पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. गंगाधर रामपुरे यांनी तर आरोपी तर्फे ॲड. अझमोधीन शेख यांनी काम पाहिले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, हा तर 'कळस' झाला !!!

| कल्याण |
| --- |
| 470-12-147 |

| मेन बाजार |
| --- |
| 348-50-127 |


## विसर्जनाची सेल्फी 'सुराज्य'च्या अंकात...

Go Green with Ecofriendly Ganesh ही मोहीम घराघरात पोहोचली आणि अवघा गणेशोत्सव इकोफ्रेंडली बनला.
लाडक्या बाप्पाचे विसर्जन सुरु होईल ते अनंत चतुर्दशी पर्यंत!
आपल्या घरातील लाडक्या बाप्पाचे घराच्या दारात, अंगणात, टेरेसवर जेव्हा विसर्जन कराल तेव्हा या क्षणाची 'सेल्फी' घ्यायला विसरु नका!
ही सेल्फी सुराज्यला व्हॉटस्अप किंवा इमेलवर पाठवा!

**सोबत आपले नाव आणि पत्ता आवर्जुन द्या...**
**आपला हा सुंदर आठवणीचा सेल्फी सुराज्यच्या अंकात प्रसिद्ध होईल.**

WhatsApp
8975768353 | 8975768352 | 9011466100 | 8888818448
8975768349 | 7775956817

Email : timemarathi@gmail.com